
# सुंदरबाग स्ट्रीटवरचा चमत्कार



कथा
नंदिता डा कुन्हा

रेखाचित्रं
प्रिया कुरियन

एकलव्य

# सुंदरबाग स्ट्रीटवरचा चमत्कार



बांद्र्यातल्या वाटिकेकरता काम केलेल्या सर्व ‘हिरव्या हातांना’
आणि संजयला (ज्याने मला बांद्र्यात आणलं)


कथा
नंदिता डा कुन्हा

रेखाचित्रं
प्रिया कुरियन

अनुवाद
रमा हर्डीकर-सखदेव



एकलव्य

# सुंदरबाग स्ट्रीटवरचा चमत्कार
# SUNDERBAAG STREETVARCHAA CHAMATKAAR

कथा : नंदिता डा कुन्हा
रेखाचित्रं : प्रिया कुरियन
आतली मांडणी आणि शब्दलेखन : तान्या मजुमदार
मराठी लेआउट : कनक शशि
अनुवाद : रमा हर्डीकर-सखदेव

मराठी अनुवाद : एकलव्य पाउंडेशन, जून २०२३
रेखाचित्रं : कल्पवृक्ष, जून २०२३

हि पुस्तक Creative Commons license Attribution NonCommercial- ShareAlike 4.0 International (CC BY-NC-SA 4.0). लायसन्सच्या अंतर्गत आहे ज्याचे विवरण http://creativecommons.org/licenses/by-nc-sa वर उपल्ब्ध आहे.

वरीलप्रमाणे क्रिएटीव कॉमन्स लायसन्सअनुसार बिगर व्यावसायिक उद्देशाने मोफत वितरणासाठी या पुस्तकाचा उपयोग केला जाऊ शकतो. तसे करताना मूळ स्रोताच्या लेखक आणि प्रकाशकाचा उल्लेख करून ते सूचित करणे गरजेचे असेल. अन्य कुठल्याही उपयोगासाठी प्रकाशकांच्या मार्फत लेखकांशी अवश्य संपर्क करा.

पराग इनिशिएटीव्ह, टाटा ट्रस्ट यांच्या आर्थिक मदतीतून साकार

आभार : तेजस्विनी आपटे-राम, हॅना मार्सडन

पहिली आवृत्ती : जून २०२३ (२००० प्रति)
कागद : १०० जीएसएम मॅपलिथो आणि ३०० जीएसएम एफएफबी (मुखपृष्ठ)
ISBN : 978-81-963643-0-4
मूल्य : ₹ 100.00

हे पुस्तक इंग्रजीमध्ये *THE MIRACLE ON SUNDERBAAG STREET* आणि हिंदीमध्येही *सुन्दरबाग स्ट्रीट में चमत्कार* नावाने उपलब्ध आहे.

प्रकाशक : एकलव्य फाउंडेशन
जमनालाल बजाज परिसर
जाटखेडी, भोपाळ 462 026 (मध्य प्रदेश)
फोना: +91 755 297 7770-71-72
www.eklavya.in; books@eklavya.in

मुद्रक : आदर्श प्रा लि, भोपाल; फोन: +91 755 255 5442

सुंदरबाग रस्ता राहण्यासाठी तशी उदास जागा होती. धुरकं आणि घाण टाळायला सगळ्या करड्या इमारती आकाशात उंच उंच गेल्या होत्या. आणि लांब चेहरा केलेली माणसं एकमेकांना टाळायला खाली माना घालून जायची.

रोज संध्याकाळी झारा तिच्या घराजवळच्या कचरा टाकायच्या आवारात (जिथे बाबाने कधीच जायचं नाही असं सांगितलं होतं) जाऊन बसायची. तिला त्या सगळ्या वातावरणापासून सुटका हवी असायची.



ती तिथल्या जुन्या बाकावर बसून गंजके डबे, गाड्यांचे सुटे भाग, आणि पानं नसल्याने निर्जीव भासणाऱ्या झाडांकडे बघत राहायची.

अंधार पडला की मोठ्या मुलांची 'तोड-फोड गँग' ऐटीत तिथे यायची. तिथे ती आपल्या कावळ्यांसारख्या कर्कश आवाजात रॅप गाण्यांचा सराव करायची. नशिबाने ती मुलं झाराकडे दुर्लक्ष करायची, आणि तिला एकटीला बसता यायचं.



मग एक दिवस, फाटक करकरत उघडलं आणि झाराची पूर्वीची क्राफ्टची शिक्षिका मिस गप्पी खुरडत खुरडत आत आली. ती बाकाच्या दुसऱ्या टोकाला कशीबशी बसली. झाराची चिडचिड झाली. गेला तिचा एकांत! शाळेतली सगळी मुलं त्यांना 'बकबक गप्पी' का म्हणायची ते तिला माहीत होतं.

"ही जागा एकेकाळी काय होती ते फक्त गप्पीला आठवतंय!" ती म्हातारी आजी बोलू लागली. झाराने मान फिरवून तिच्याकडे दुर्लक्ष करायचा प्रयत्न केला.

मिस गप्पीने एका लालचुटुक वाडग्यात धान्य आणि बिया आणल्या होत्या. तिने तो वाडगा समोर धरला तेव्हा काही लहानशा चिमण्या त्यावर आल्या. त्या चिमण्या चिवचिव करत इकडे तिकडे उडक्या मारत असताना झारा हळूच डोळ्यांच्या कोपऱ्यातून त्यांना पाहत राहिली.



दुसऱ्या दिवशी झाराला आणखी काहीतरी पाहायला मिळालं. तिथल्याच कचऱ्याच्या ढिगातून मिस गप्पीने एक बाटली बाहेर ओढली आणि त्याचा बर्ड-फीडर बनवला. तिसऱ्या दिवशी मिस गप्पीने एका जुन्या लाकडी खोक्याला भोक पाडून पक्ष्यांसाठी घर बनवलं. "या चिमण्यांनो, पुन्हा राहायला या इकडे," ती गोड आवाजात त्यांना साद घालू लागली.

चौथ्या दिवसापर्यंत झारा स्वतःच मिस गप्पीची वाट बघू लागली. ती आज काय बरं बनवेल, याची तिला उत्सुकता वाटू लागली.





पण पाचव्या दिवशी आल्यावर ती विणकामच करू लागली आणि म्हणाली, "या ठिकाणी पूर्वी काय असेल ओळख बरं?"

"नाही! मला नाही आवडत असे ओळखायचे खेळ," झारा म्हणाली. आणि मग त्या म्हाताऱ्या आजींच्या लटपटत्या हातातून विणायची सुई खाली पडली. गवताच्या हजारो पात्यांमधून तुम्ही कधी विणायची सुई शोधायचा प्रयत्न केलाय? मिस गप्पीला गवतात हातांनी चाचपत सुई शोधताना पाहून झाराने सुस्कारा सोडला. आता तिला मदत करावीच लागणार होती.

ते काम फारच अवघड होतं आणि सावकाश करावं लागत होतं. झारा गप्पीप्रमाणे हातांनी कोरडी माती भुसभुशीत करून गुडघ्याएवढं उंच गवत उपटू लागली. हळूहळू गवताचा ढीग वाढू लागला, माती उकरली जाऊ लागली आणि झाराचं हृदय धडधडू लागलं.

"तुझ्या आईला चालतं तू इथे आलेलं?" मिस गप्पीने नाक खुपसत विचारलं. झारा काहीच बोलली नाही. "आईला का नाही चालणार?" तिने मनाशी विचार केला. "ती मला सोडून चांदण्यांकडे गेलीये. आणि बाबाचं तर आता कशाकडेच लक्ष नसतं. म्हणजे तिच्या पुस्तकांवर धूळ जमली किंवा तिची गुलाबाची झाडं कोमेजली तरी."

त्या दोघी काही न बोलता शोधत राहिल्या. शेवटी गप्पी ओरडली, "मिळाली." आणि तिने आपल्या ओढणीच्या घडीतून शांतपणे विणायची सुई बाहेर काढली! मग जाता जाता ती म्हणाली, "उद्यापर्यंत थांब, मग बघ!" "उफ्फ! आता उद्या काय असेल?"



दुसऱ्या दिवशी मिस गप्पीने बिया आणि पाणी घालायला झारी आणली आणि ती कामाला लागली. बाकाशेजारी त्यांनी केलेल्या मोकळ्या जागेत तिने थोड्या बिया विखुरल्या. बरेच दिवस ती त्यांना पाणी घालताना झारा बघायची.

एका संध्याकाळी मिस गप्पी म्हणाली, "काय दिवस होते... वर लाल-सोनेरी रंगांची उधळण झालेली असायची आणि खाली जमिनीवर हिरवे गालिचे उगवून यायचे... अगदी इथेच. इथे पूर्वी काय होतं ते तुला ओळखता नाही येते अजून?" पण झाराचं लक्षच नव्हतं. तिला दुसरंच काहीतरी सापडलं होतं — बीमधून उगवलेला एक अंकुर!



ज्या दिवशी त्या अंकुराला पानं फुटली त्या दिवशी गप्पी हळूच बाकावर झाराच्या बाजूला सरकली आणि म्हणाली, "आता मला रश्श्यात घालायला बेझिलची पानं होतील. थँक्यू." तिने झाराचा हात हातात घेतला.

झाराच्या आत काहीतरी लहानसं, उबदार तयार झालं होतं. अचानक ती म्हणाली, "तुम्ही आता एखादं फुलझाड लावून बघा!"

"तुला फुलं हवी असतील तर तू त्याची झाडं लाव," मिस गप्पी म्हणाली. "इथे एकेकाळी काय होतं ते तुला माहीत असतं तर..."

"हो, हो, प्लीज बास!" झारा ओरडली. "काय होतं काय इथे?"



"इथे एक बाग होती! मी इथे बसून त्या बंगल्यातल्या लीला पटेलला बासरी वाजवताना ऐकायचे. सेठींचा मोठ्यामोठ्या डोळ्यांचा मुलगा आमच्या भोवती टायरच्या मागे पळत असायचा. आम्ही गप्पा मारत आसपास राहणाऱ्या लहान बाळांसाठी मोजे विणायचो, आणि छोट्याछोट्या खारी आमच्या भोवती तुरुतुरु पळत असायच्या."

"वर तर जादूच असायची! गुलमोहराच्या लाल ज्वाळा, बहाव्याच्या सोनेरी पिवळ्या घोसांचा शिडकावा... आणि खाली तर विचारूच नकोस..." मिस गप्पीची नजर दूर कुठेतरी लागली होती. "लिली आणि झेंडू, फिकट गुलाबी म्युसेंडा, आणि मधुमालतीच्या वेली..."



त्या रात्री झाराच्या स्वप्नात, बहरलेल्या भल्यामोठ्या वेलींसोबत गुलाबी-पांढरी फुलं तिच्या मनाच्या प्रत्येक कोपऱ्यात पसरली. पुढच्या रात्री तिच्या स्वप्नातल्या बागेत सगळ्या रंगांची फुलं उमललेली होती. तिसऱ्या रात्रीपर्यंत त्या फुलांनी अद्भुत आकारही धारण केले होते — घंटा आणि तुतारी, फडफडणारे पंखे आणि नाचणाऱ्या चांदण्या.

जेव्हा ती पुन्हा मिस गप्पीसोबत कचरा टाकायच्या आवारात बसली, तेव्हा तर तिला उघड्या डोळ्यांसमोरच ती फुलं दिसू लागली. "मी एक फुलझाड लावणार नाहीये. मी ती बाग पुन्हा तयार करणार आहे," झाराने जाहीर केलं.

"ती वेळ आलीच होती." मिस गप्पी मोठ्याने हसत, बोटं मोडत उद्गारली.



पण अशी 'बाग पुन्हा तयार करणं' काही सोपी गोष्ट नव्हती.

पहिल्यांदा तर तिथला कचरा साफ करायला त्यांना मदत लागणार होती. झाराला एक कल्पना सुचली — 'तोड-फोड गँग' मधली मुलं! ती अंधार पडेपर्यंत थांबली (सोपा भाग) आणि मग तिने त्यांना विचारलं (भीतीदायक भाग!).

ती मुलं हसली आणि मग... काहीतरी अद्भुतच घडलं... ती हो म्हणाली! "आम्हाला नाचायला आणखी जागा मिळेल! यो!" ती मुलं म्हणाली.



दुसऱ्या दिवशी संध्याकाळी त्यांनी कचरा साफ करायच्या अवघड कामाला सुरुवात केली. त्यांच्या साफसफाईचा आवाज ऐकून तिथे कोण डोकावलं माहितेय? किराणा दुकानदार सेठी काका! तेच ते मोठ्यामोठ्या डोळ्यांचे सेठी काका त्यांच्या मदतीला धावून आले. रोज रात्री त्यांचे ट्रक सगळा कचरा, राडारोडा घेऊन जायचे.

त्यांनी कचऱ्याचा शेवटचा कण स्वच्छ केल्यानंतर गप्पीने मोकळ्या झालेल्या जमिनीवर पायाने आपटून पाहिलं आणि ती रडवेल्या आवाजात ओरडली, "खूपच कोरडी आहे. आणि फार कडक, सॉरी."

"ही जमीन मरून गेलीये. इथे काहीच उगवणार नाही!" झारा म्हणाली. तिचे डोळे पाण्याने डबडबले.





हा आवाज कसला होता? ट्रक परत येत होते की काय? हो — आणि त्यांनी पोती भरभरून कसदार लाल माती आणली होती! येस्स! सेठी काका जिंदाबाद!

बागेचं काम खूपच होतं. पण झाराने मनाशी पक्कं ठरवलेलं असल्याने तिने हार मानली नाही.

तिने उजळ रंगाच्या खडूने लिहिलेली एक पाटी तिथे लावली — 'आपली सुंदरबाग वाचवायला मदत करा!'



कुतूहलाने लोक आत डोकावून पाहू लागले. हळूहळू त्यातले काही जण आत आले. मग आणखी लोकांची पावलं तिकडे वळू लागली. त्यांनी कुदळी, फावडी, कात्र्या, रोपं आणि बिया आणल्या.

त्यांनी ती लाल माती नीट पसरवून सारखी केली.



काहींनी रोपं लावली, काहींनी फांद्या छाटल्या, काहींनी नवीन मातीला खत म्हणून चादरी भरून पालापाचोळा आणला.

काहींनी सगळ्यांसाठी खाऊ आणला.

लवकरच झाराच्या बागेत लोकांची वर्दळ वाढली. रोज संध्याकाळी लोकांच्या गप्पांनी आणि काम करण्याने तयार झालेल्या उबदार, प्रेमळ वातावरणात झारा न्हाऊन निघायची.



बागेत बदल दिसून यायला बराच काळ लागला, पण ते सगळे काम करत राहिले आणि वाट बघत राहिले. झारा त्यांच्यातली सगळ्यात जास्त धीर धरलेली आणि चिकाटीने काम करणारी मुलगी होती. तिला रोज नवनव्या कल्पना सुचायच्या — दुधाच्या चरवीची तिने कुंडी केली, एका टायरचा झोका केला आणि एका फळकुटापासून बाक बनवला.



ते सगळे स्वतःला 'बागकाम टोळी' म्हणवून घ्यायचे.

ज्या दिवशी त्यांच्या केळीवर पावसाच्या धारा बरसल्या त्या दिवशी सगळे एकत्रच रडले.

मग एक मोठ्ठा चमत्कारच घडला. वीस वर्षांनी पहिल्यांदाच जुन्या तुतीच्या झाडाला फळं लागली. तेव्हा त्यांनी मिस गप्पीचा तुतीचा केक खाऊन एकत्रच तो दिवस साजरा केला.

आणि आपली बाग बहरताना ते एकत्रच पाहायचे...



बाग बहरत गेली...



आणखी बहरत गेली...



त्यांची बाग इतकी फोफावली आणि हिरवीगार झाली, की तिचं नव्याने उद्घाटन करायला त्या रस्त्यावरच्या सगळ्यात प्रसिद्ध व्यक्तीला बोलावण्यात आलं.

मिस गप्पीने त्यांना 'बागकाम टोळी'च्या सगळ्यात लहान सदस्याला भेटायला नेलं. ती म्हणाली, "हीच ती मुलगी जिने या सगळ्याची सुरुवात केली... ही..."

"झारा?" त्या व्यक्तीने विचारलं.

"बाबा?" झारा हळूच पुटपुटली.

"किती भारी!" बाबा म्हणाला. "खूप खूप भारी!"



झाराने बाबाचा हात धरून त्याला झगझगीत पिवळ्या झेंडूचे वाफे, आणि लालचुटुक टोमॅटो आणि मिरच्या उगवलेले भाज्यांचे वाफे दाखवले.

बाबा म्हणाला, 'मी एका जुन्या झाडाची फांदी आणली आहे. आपण दोघांनी मिळून ती लावू या का?'

झाराच्या मनात आनंद मावेनासा झाला. 'तिचे गुलाब.' इतकंच ती हळूच म्हणू शकली.



झारा अजूनही रोज संध्याकाळी तिच्या बाकावर बसते. पक्षी आणि फुलपाखरं बघते, कारंज्याचा, आणि बोबडं बोलणाऱ्या बाळांचा आवाज ऐकते, गार वारा खाते आणि तिच्या चेहऱ्यावर हसू उमटतं. कारण आता, ती कधीच एकटी नसते.



“माझी धाकटी बहिण सुनयना ही नेहमी माझी पहिली वाचक असते. ती माझं लेखन पुन्हा पुन्हा वाचून, त्याचं परीक्षण करते, त्याबद्दल तिचे खूप आभार. माझ्या संपादिका, तान्या आणि सुजाता यांचेही आभार. त्यांच्या सूचनांमुळे हे पुस्तक चांगलं आकाराला येऊ शकलं!”

- नंदिता डा कुन्हा



नंदिता डा कुन्हा

मुंबईत राहणारी नंदिता लहान मुलांची पुस्तकं लिहिते. ‘एक्सएलआरआय’मधून एमबीए केल्यानंतर तिने आर्थर अँडरसन आणि केपीएमजी यांच्यासोबत स्ट्रॅटेजी कन्सल्टंट म्हणून काम केलं. त्यानंतर मात्र तिने पूर्ण वेळ तिच्या आवडीच्या कामाला म्हणजेच लेखनाला द्यायचं ठरवलं! नंदिता आपला नवरा, दोन लहान मुली आणि ८० झाडांसोबत मुंबईत राहते, आणि रोज सकाळी बागकाम करते.

प्रिया कुरियन



प्रिया कुरियन लहान मुलांची पुस्तकं लिहिते आणि त्यासाठी चित्रंही काढते. ती कॉमिक्ससुद्धा तयार करते आणि ॲनिमेशनही करते. तिने सेसमी स्ट्रीट शो (भारत) आणि चिल्ड्रन्स फिल्म सोसायटी ऑफ इंडिया (सीएफएसआय) यांच्यासाठी शैक्षणिक चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. तसंच तिने मुलांच्या अनेक पुस्तकांसाठी चित्रं काढली आहेत. पाओ, धिस साईड दॅट साईड, ईट द स्काय, ड्रिंक द ओशन आणि फर्स्ट हँड २ (ललितेतर कॉमिक्सचा संग्रह) या भारतीय कॉमिक्स संग्रहांमध्ये तिचं योगदान आहे. तिने एलिफंट इन द रूम या भारत-जर्मनी यांच्या संयुक्त विद्यमाने, झुबानने प्रकाशित केलेल्या पुस्तकासाठीही काम केलं आहे. तिने देवप्रिया रॉय या लेखिकेसोबत नुकतंच मुलांसाठी इंदिरा गांधी यांचं चित्रमय चरित्र तयार केलं आहे.

लहानगी झारा रोज संध्याकाळी सुंदरबाग रस्त्यावरच्या कचरा टाकायच्या आवारात एकटीच बसत असते. एक दिवस फाटक करकरत उघडतं आणि मिस गप्पी आत येते. ती झाराच्या मनात एक कल्पना पेरते. त्यामुळे त्या दोघी झपाटून जाऊन एक मोठं काम हाती घेतात, आणि त्याने झाराचंच नव्हे तर सुंदरबाग रस्त्यावरच्या कित्येकांचं आयुष्यच बदलून जातं...

KALPAVRIKSH
कल्पवृक्ष
parag
AN INITIATIVE OF TATA TRUSTS
₹100
9 788196 364304
एकलव्य



